# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

### सेफ्टी शूज संबंधी

बंधू-भगिनींनो,

नित्कृष्ट दर्जाच्या सेफ्टी शूजमुळे अपघात घडण्याच्या BPB-BPB प्लॅटफॉर्म तसेच इतर रीगवरुन अनेक तक्रारी कर्मचारी संघटनेकडे आलेल्या होत्या. त्यातच LIBERTY कंपनीच्या बुटांचा साठा जुना झाल्यामुळे सेफ्टी शूजचे सोल निखळत असल्याच्या तक्रारीही मुंबई हाय ॲसेटमधून कर्मचारी संघटनेकडे आल्या. कर्मचारी संघटनेने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने जागतिक अव्वल दर्जाचे शूज (REDWING / PANTHER) हे ओएनजीसीतील कामगारांना मिळावेत यासाठी मा. श्री. दिपक सर्राफ, चेअरमन यांना दि. 15.10.2015 (संदर्भ क्र. ONGC/KS/401/2015), दि. 08.03.2016 (संदर्भ क्र. ONGC/KS/22/ 2016), व दि. 15.04.2016 (संदर्भ क्र. ONGC/KS/36/2016) पत्रे लिहिली होती. त्यानंतर डायरेक्टर ऑफशोर यांच्या मुंबई भेटीत कर्मचारी संघटने बरोबर सदर विषयावर मिटींग बोलावून चर्चा करण्यात आली. व याविषयी निर्णय घेण्यासाठी मा. श्री. मोरबाळे, ED-N&H Asset यांची नियुक्ती केली. श्री. मोरबाळे, तसेच HRO, HEAD FMG यांचेबरोबर अनेक दिवस याविषयी कर्मचारी संघटनेचा पाठपुरावा चालू होता.

त्यानंतर ओएनजीसी मॅनेजमेंटने त्वरीत सेफ्टी शूज खरदी करण्याची प्रक्रिया चालू केली. मात्र सेफ्टी शूज खरेदीची प्रक्रिया करताना शूजच्या SPECIFICATIOS मध्ये अचानक बदल केला गेला. सेफ्टी शूजच्या सोलसाठी 300*C तापमान सहन करण्याची क्षमता असण्याऐवजी 120*C क्षमता चालेल असा मॅनेजमेंटने बदल केला. पूर्वीची 300*C तापमानाची अट कायम ठेवली असती तर त्यात BATA, LIBERTY किंवा अन्य सेफ्टी शूज Qualify झालेच नसते व केवळ REDWING / PANTHER किंवा जागतिक पातळीवरील अव्वल दर्जाचे 300*C तापमान सहन करण्याची क्षमता असलेले शूजच Qualify झाले असते. ओएनजीसीने 300*C ची अट काढून 120*C पर्यंत शिथिल केल्यामुळे BATA, LIBERTY तसेच अन्य लोकल कंपन्यांकडून ओनजीसीचे टेंडर भरले गेले. या लोकल शूजच्या किंमती रु.1200/- ते 1800/- पर्यंतच आहेत. तर REDWING / PANTHER सारख्या शूजची किंमत रु. 6000/- च्या आसपास आहेत. परंतू ओएनजीसीच्या L1 प्रथेप्रमाणे कमीत कमी किंमत असलेलेच टेंडर पास होणार. यामुळे REDWING / PANTHER या नामांकित कंपनीने आपले टेंडरच ओएनजीसीत भरले नाही. कर्मचारी संघटनेची मागणी होती कि 300*C तापमानाची अट आहे तीच कायम ठेवावी त्यामुळे REDWING / PANTHER किंवा इतर जागतिक दर्जाच्या चांगल्या शूजच्याच कंपन्या या उच्चतम डिग्रीसाठी टिकाव धरु शकतील व टेंडर भरण्यासाठी सहभागी होवू शकतील.

यापूर्वी आसाम, बडोदा, कराईकल इ. ठिकाणी तेथिल कर्मचाऱ्यांना REDWING / PANTHER चे शूज मिळालेले आहेत. असे असताना ''Make in India'' तसेच "Coat Saving" या ओएनजीसीच्या नविन धोरणानुसार कमीतकमी किंमतीचे सेफ्टी शूज घेण्याचा ओएनजीसीने घाट घातला आहे. आज सुध्दा ओएनजीसी कर्मचाऱ्यांना काम करताना जागतिक उत्तम दर्जाचे शूज मिळावयास हवे असा कर्मचारी संघटनेचा आग्रह आहे. सेफ्टी शूज संदर्भात ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (BIS) यांच्या मध्ये फेरफार करण्याचा अधिकार कोणासही नाही. असे असताना ओएनजीसी मॅनेजमेंटने यामध्ये केलेला फेरफार ही निश्चितपणे गंभीर बाब

आहे. मॅनेजमेंटचा रोष पत्रावा लागला तरी बेहत्तर, पण सदर गंभीर प्रकारासंदर्भात मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, सेंट्रल विजिलंस तसेच इतर संबंधितांकडे यासंदर्भात तक्रार करण्याचा गंभीर इशारा कर्मचारी संघटनेने मॅनेजमेंटला दिलेला आहे. कर्मचारी संघटनेने मॅनेजमेंट समोर चांगले पर्याय ठेवलेले असताना देखिल मॅनेजमेंट कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत धोकादायक तडजोड करीत आहे.

मित्रहो, ऑफशोर मधिल कामगारांना उत्कृष्ट प्रतीचे सेफ्टी शूज मिळावेत म्हणून गेले अनेक महिने कर्मचारी संघटना सातत्याने प्रयत्न करीत आहे. परंतू ओएनजीसीच्या Terms & Conditions आणि Specifications मुळे येथिल कामगारांना उच्च प्रतीच्या शूजपासून वंचित राहावे लागत आहे. नित्कृष्ट दर्जाच्या सेफ्टी शूज मुळे जर कामगारांचे भविष्यात अपघात झाले तर त्याला केवळ मॅनेजमेंटच पूर्णपणे जबाबदार असणार आहे. अशा प्रकारच्या घटना घडल्या तर कर्मचारी संघटना या घटनेचा पूर्णपणे विरोध करुन रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही हे मॅनेजमेंटने पक्के ध्यानात ठेवावे. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी कर्मचारी संघटना कटिबध्द आहे.

धन्यवाद.

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !**

**कामगार एकता झिंदाबाद !!**

(प्रदीप मयेकर)
सरचिटणीस